कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२३-२०२४/१२०४
दि. ०५/०९/ २०२३

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित मराठी 'ब' गट नाटय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम मुदत ०८ सप्टेंबर २०२३ असून स्पर्धेची नियमावली व निर्धारीत नमून्यातील प्रवेशिका कला अकादमीच्या कार्यक्रम व विकास विभाग, आदिलशाह पॅलेस, जुने सचिवालय, पाटो, पणजी-गोवा येथे विनामूल्य उपलब्ध असणार आहेत.

इच्छुक नाटयसंस्थानी आपल्या प्रवेशिकेसोबत प्रवेशशुल्क रु.५००/-(रुपये पाचशे मात्र)व अनामत रक्कम म्हणून रु.५०००/-(रुपये पाच हजार मात्र)अकादमीकडे भरणे आवश्यक आहे. सदर रक्कम कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी रोज सकाळी १० ते दुपारी १.०० व सायं. २.०० ते ४.०० या कालावधीत स्वीकारली जाईल.

स्पर्धेतील सादरीकरणाचा अनुक्रम त्याचदिवशी सायं.५.०० वाजता आदिलशाह पॅलेस येथील कला अकादमीच्या कार्यालयात सर्व संस्था प्रतिनिधींच्या समक्ष चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल. त्यानंतर प्रवेशिका मागे घेण्यासाठी ५ दिवसांची मुदत असून या निर्धारित मुदतीनंतर प्रवेशिका मागे घेता येणार नाही. तरी या अंतिम मुदतीची नोंद घेऊन सर्व इच्छुक नाटयसंस्थानी आपल्या प्रवेशिका निर्धारित मुदतीत दाखल कराव्यात असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)